# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील स्त्रीमाहात्म्य

**डॉ. सौ. वैशाली गभने**
सहाय्यक प्राध्यापक
लक्ष्मीबाई कला व वाणिज्य महाविद्यालय,
खापा मांगली, त. तुमसर, जि. भंडारा
9370199246
dr_gabhane@rediffmail.com

सारांश

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी लिहिलेल्या ग्रामगीतेतून समाजाला विशेषत: ग्रामीण समाजाला भरपूर मार्गदर्शन केले आहे. समाजव्यवस्था, आचारधर्म, ग्रामरक्षण, जीवनशिक्षण, उपासना, महिलोन्नती यासारखे विविध विषयांवर राष्ट्रसंतानी अगदी सोप्या भाषेतून मौलिक विचार ग्रामगीतेत मांडले आहेत. वर्तमान युगात निर्माण होणारे प्रचंड साहित्य त्यांचे साहित्यमूल्य विचारात घेता, ग्रामगीता हा ग्रंथ फारच मौल्यवान वाटतो. ग्रामगीतेतील राष्ट्रसंतांनी मांडलेले विचार, केलेले मौलिक मार्गदर्शन त्रिकालबाधीत सत्य आहे. ग्रामगीतेच्या विसाव्या अध्यायात स्त्रीजीवनविषयी मांडलेले विचार, स्त्रीवैशिष्ट्ये, स्त्रीसामर्थ्य, स्त्रीशिक्षण, स्त्रीसंघटन याबाबत अत्यंत सरळ व सोपे मार्गदर्शन दिसून येते. सदर संशोधनात्मक लेखात ग्रामगीतेतील या अध्यायाचे सुक्ष्म अध्ययन करून त्यातील स्त्री विषयीच्या विविध पैलूंचे विवेचनात्मक सादरीकरण केले आहे.

**प्रस्तावना :—**

ग्रामगीतेतील एकूण ४१ अध्यायापैकी २० व्या अध्यायातील ११२ ओव्यामध्ये राष्ट्रसंतांनी स्त्री विषयी महत्वाचे वर्णन केले आहे. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी तीच जगाते उद्धारी। या दोनच ओळीत राष्ट्रसंतांनी स्त्रीची महानता वर्णन करून दिली. शिक्षण व संस्कार हे घरातूनच सुरू होतात. मुलांची पहिली शाळा घर व प्रथम शिक्षक वा गुरू 'आई' असते. हल्लीच्या आयुष्यात अनेक भूमिका पार पाडायच्या असतात, त्यातीलच आई ही भूमिका सर्वव्यापी आहे. तिची सर्व शक्ती, बुद्धी यात पणाला लागते.

''उत्तम महिला हेचि करी । आपुले घर ब्रीदासह सावरी।
मुल बाळ आदर्श करी । वरी प्रेमळपण सर्वांशी ।'' (ओवी ७)

घर सांभाळणे हे एक ब्रीद म्हणून ती स्वीकारते, आपल्या मुलाबाळांना आदर्श बनविण्याचा सतत प्रयत्न करते आणि हे सगळं करतांना घरातील सर्वांशी प्रेमपणाने वागते हा किती मोठेपणा आहे. या चार ओळीत स्त्रीचे सामर्थ्य दिसून येते.

पुढे राष्ट्रसंत लिहितात,

''घरचा उत्तम कामधंदा । हे महिलेचि लक्षण सदा ।
आलिया —गेलियासि आपदा । महिला असता न वाटे ।'' (ओवी १८)

घराला घरपण स्त्री शिवाय येऊ शकत नाही, घरी आलेल्या पाहुणे मंडळीचे स्वागत घरात स्त्री असेल तरच उत्तमरित्या होऊ शकते आणि त्यामुळे घरी येणाऱ्या जाणाऱ्या मंडळी खूश होतात. खरेच

आहे. घरात आई उपस्थित नसेल तर मुलबाळ पोरकी झाल्यासारखी होतात, घराला उदासपण येते. म्हणूनच राष्ट्रसंत म्हणतात. स्त्रीने आपल्या घराची जबाबदारी निटपणे पार पाडणे हे स्त्रीत्वाचे मुख्य लक्षण आहे.

स्त्रीला फक्त आई वा महिला म्हणून चालणार नाही तर ती माऊलीच आहे.संत ज्ञानेश्वरांन ाआपण ज्ञानेश्वर माऊली म्हणून उच्चारतो ते यामुळेच कारण सर्वांवर प्रेमाचा अविरत निस्वार्थ वर्षाव ही माऊलीच करू शकते. म्हणूनच राष्ट्रसंत पुढील ओवीत म्हणतात.

''माऊलीचे स्वभाव कर्म । तोचि जगी म्हणविला मानवधर्म।
माऊलीचे उत्कट प्रेम । म्हणोनीच देव प्रिय लोकां ।'' (ओवी २४)

अशीही स्त्रीची महती असल्यामुळे ही माऊली देव लोकांमधेही प्रिय आहे. परंतु हे सांगताना राष्ट्रसंतानी पुढील ओव्यांमध्ये सतर्कतेचा इशाराही दिला आहे.

''परि यातूनि एकचि घ्यावे । स्त्रियेसि कोठे अव्हेरावे।
कोठे माऊली म्हणोनि पाय धरावे । ओळखावे हे तारतम्ये । (ओवी ३७)
कोठे वागवावे मित्र भावे । कोठे देवी म्हणोनि पुजावे ।
कोठे वैरिणीसारखे बघावे । स्थलकाल पात्र भेदाने ।'' (ओवी ३८)

स्त्रीला माऊलीचा मान देताना स्थलकालाचे भाव ठेवावे नाही तर मोठा गोंधळ निर्माण होवू शकतो हेच राष्ट्रसंतांना यातून सांगायचे आहे असे वाटते.

''काही मुली शक्ति शिक्षण घेती । मुलांपेक्षा हि धीट असती ।
नाही गुंडाचीहि छाती । हात घालील त्यांचेवरि । (ओवी ५९)
तेथे कासयासि पडदा? । परावलंबनाची आपदा ।
आत्मसामर्थ्यानेच सदा । स्त्रिया मर्दिनी असूरांना ।'' (ओवी ६०)

वरील ओव्यांमध्ये स्त्री सामर्थ्याचे वर्णन केले आहे. मुलींना मुलांसारखे शिक्षण दिले पाहिजे, त्यामध्ये भेदाभेद अजिबात करू नये असे राष्ट्रसंतांना म्हणायचे आहे. मुलांप्रमाणे मुली शक्ती प्रदर्शन करू शकतात. त्यामुळे गुंडासोबत दोन दोन हात करायला मागे पुढे पाहणार नाही. आत्मसामर्थ्य प्राप्त केले तर राक्षस प्रवृत्तीस स्त्रीया तोंड देवू शकतात. शिक्षणाने महिलांचा आत्मसन्मान वाढून आंतरिक गुणांचा विकास हमखास होतो. त्यासाठी राष्ट्रसंत खालील ओव्यांमध्ये म्हणतात.

''महिलांच्या आंतरिक गुणांचा विकास । करील ऐसे शिक्षण खास ।
जरि दिले जाईल त्यास । तरीच भावी जग पालटे ।
महिलांचे उच्चतम शिक्षण । शिक्षणात असावे जीवनाचे स्थान ।
जीवनात असावे स्वारस्य पूर्ण । शांति, दयादि भावनांचे ।'' (ओवी ८४, ८५)

यासाठी ते पुढे म्हणतात,

''ऐसे समाजी न व्हावे । मुलांपरिच मुलींना शिकवावे ।
त्यांच स्थानमान नेहमी असावे । सहकारितेचे । (ओवी ९०)
मुलांस विविध उच्च ज्ञान द्यावे । तैसेचि मुलींनाहि शिकवावे ।
हेळसांड करू नये हे जाणावे । समाजाने ।'' (ओवी ९१)

यावरून असे दिसते की, राष्ट्रसंतांनी स्त्री शिक्षण कसे महत्वाचे आहे हे जाणले होते व त्यामुळेच ग्रामगीतेतून स्त्री शिक्षणाद्वारे स्त्रीसामर्थ्य वाढण्यास निश्चीतच मदत होईल असे प्रतिपादन केले आहे.

शिक्षणासोबत स्त्रीमध्ये संघटन शक्तीचा विकास होण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला पाहिजे त्यासाठी राष्ट्रसंत म्हणतात,

''जैसी मुलांची संघटीत सेना । तैसी स्त्रियांची असावी संघटना ।
आपुल्या सुखदु:खाच्या भावना । प्रकटवाव्या सभा संमेलनी ।'' (ओवी १०२)

स्त्रीयांना पुरूषांप्रमाणेच समाजात समान हक्क व स्थान प्राप्त झाले तर समाजाचे संतुलन तयार होईल. नाहीतर समाज एककल्ली होईल व तो समाज सुस्वस्थ होणार नाही. हे समजावून सांगतांना राष्ट्रसंत म्हणतात,

''म्हणोनि रथाची दोन्ही चाके । मजबूत करावी कातोनि सारखे ।
तरीच संसारगाडी सुखे । सुखावेल ग्रामजीवनाची ।'' (ओवी ११०)

त्यामुळे अशा या संतुलीत समाजातून निर्माण होणारी पिढी आदर्श होईल. आदर्श समाजाचा भारत देश हा वैकुंठ झाल्याशिवाय राहणार नाही असा आशावाद ते प्रगट करतांना म्हणतात,

''आदर्श ऐसे मातापिता । जन्म देतील आदर्श सुता ।
ते वैकुंठ बनवतिल भारता । तुकडया म्हणे ।'' (ओवी १११)

एकंदरीत विसाव्या अध्यायातील संपूर्ण ११२ ओव्यांमध्ये महिलांच्या उन्नतीसाठी आदर्श समाज निर्मितीसाठी महिलांचे योगदान, स्त्रीसामर्थ्य, संघटनशक्ती या विविध पैलूंचा उहापोह राष्ट्रसंतांनी अगदी साध्या व सोप्या भाषेत केलेला आहे. शेवटी एकच म्हणावेसे वाटते की, ग्रामगितेतील हा अध्याय महिलोन्नतीसाठी एक मैलाचा दगड आहे, दुसऱ्या भाषेत सांगायचे झाल्यास एक पथ दर्शकच आहे.

**संदर्भ –**

१. ग्रामगिता – राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
२. तत्रैव, ओवी ७
३. तत्रैव, ओवी १८
४. तत्रैव, ओवी २४
५. तत्रैव, ओवी ३७
६. तत्रैव, ओवी ३८
७. तत्रैव, ओवी ५९
८. तत्रैव, ओवी ६०
९. तत्रैव, ओवी ८४
१०.तत्रैव, ओवी ८५
११.तत्रैव, ओवी ९०
१२.तत्रैव, ओवी ९१
१३.तत्रैव, ओवी १०२
१४.तत्रैव, ओवी ११०
१५.तत्रैव, ओवी १११